# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Estd-1962
NAAC `A'Grade

## ५६ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात गुरुवार दि.६ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी १०.४५ वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत.
- ५६ व्या दीक्षांत समारंभामध्ये गतवर्षीप्रमाणेच महाराष्ट्र शासनाच्या सुधारीत परिनियमानुसार पदवी प्रमाणपत्रे वितरण प्रक्रिया राबविली जाणार आहे.
- दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढ-या रंगाचे खादी सलवार कुर्ता/कमीझ किंवा जोधपुरी (पुरुषांसाठी) व पांढ-या/मोती रंगाची खादीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.
- ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प, अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर एक महिन्यानंतर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना जीतवनही ब्वससमहम असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेमधून देण्यात येतील. यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्राचार्य अथवा जबाबदार प्रशासकीय अधिका-यास अधिकार पत्रासह पाठवावे जेणेकरुन संबंधितांकडे उपरोक्तप्रमाणे अर्ज केलेल्या स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे हस्तांतरीत करण्यात येतील. महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, नावे विद्यापीठ संकेतस्थळावर ब्वदअवबंजपवद सदरात प्रसिध्द करण्यात आली आहेत.
  (टीप :- महाविद्यालयांमार्फत पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यास येणा-या प्राचार्य/प्रशासकीय सेवक/ प्रतिनिधी यांचे सोबत महाविद्यालयाच्या ओळखपत्राची साक्षांकित प्रत व अधिकार पत्र असणे अनिवार्य आहे.)
- एम.फिल., पीएच.डी. स्नातक व विद्यापीठाच्या विविध अधिविभागातील स्नातकांना विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ८:०० ते १०:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर दुपारी १:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यत विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेव्दारे पदवी प्रमाणपत्रे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करता येईल.)
- दूरशिक्षण अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची पदवीप्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर एक महिन्यानंतर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- ५६ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणा-या पारितोषिक प्राप्त, व्यासपीठाव्यतीरिक्त पारितोषिक प्राप्त तसेच पीएच.डी. स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/56convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**श्री. गजानन पळसे**
**प्र.संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**दीक्षांत विभाग**
**दि .: ०४/०२/२०२०**